जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५१ दिनांक - २२/०१/२०२५**

अंमली पदार्थ विरोधी पथक १ गुन्हे शाखा,पुणे शहर

# एक (१) किलो आफिम सह एक जण ताब्यात

मा.पोलीस आयुक्त,श्री अमितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त, रंजनकुमार शर्मा, यांनी पुणे शहरातील गुन्हेगारीला आळा घालण्याकरीता तसेच अंमली पदार्थ विरोधी मोहिम राबवुन जास्तीत जास्त अंमली पदार्थ तस्कर यांचे विरुध्द माहिती काढुन कारवाई करणे बाबत दिलेले सुचना दिल्या होत्या.

त्यासुचनाप्रमाणे अंमली पदार्थ विरोधी पथक १ गुन्हे शाखा पुणे शहर कडील अधिकारी व अंमलदार असे गुन्हे प्रतिबंधात्मक, तसेच अंमली पदार्थाचे गैरव्यवहाराचे अनुषंगाने पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना उन्नती धाम सोसायटीच्या बाहेरील सार्वजनिक रोडवर कोंढवा पुणे. येथे एक इसम हा त्याचे हातामध्ये लाल रंगाची ट्रॅव्हलबॅग घेवुन संशयितरित्या उभा असल्याचे दिसुन आल्याने त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव पत्ता **नाथुराम जीवणराम जाट, वय - ५२ वर्षे, रा. मु/पो असावरी, तेहसील- मुंडवा, जि. नागोर, राज्य राजस्थान** असे असल्याचे सांगितले त्याची झडती घेतली असता त्याचे ताब्यामधुन **एकुण किं.रु. २१,८०,०००/-रु .चा, ऐवज त्यामध्ये १ किलो ९० ग्रॅम आफिम** हा अंमली पदार्थ मिळुन आल्याने तो जप्त करण्यात आला असुन, त्याचे विरुध्द कोंढवा पोलीस ठाणे येथे एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८ (क), १७ (ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर आरोपीकडे अधिक तपास केला असता तो फर्निचर बनवण्याच्या कामासाठी यापुर्वी पुणे शहरामध्ये आल्याचे सांगुन अल्पावधीत पैसे कमावण्याच्या इरादयाने अफिम विक्री करण्यासाठी पुण्यामध्ये आणले असल्याचे सांगितले.

वरील नमुद कारवाई ही मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री अमितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त पुणे श्री.रंजनकुमार शर्मा मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री निखील पिंगळे, मा.सहा पो आयुक्त,गुन्हे १ श्री गणेश इंगळे यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक,१चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उल्हास कदम, सहा पोलीस निरीक्षक अनिकेत

पोटे, पोलीस अंमलदार, दयानंद तेलंगे पाटील, संदिप शिर्के, विशाल दळवी, सचिन माळवे  प्रविण उत्तेकर, संदेश काकडे,  दत्ताराम जाधव, ज्ञानेश्वर घोरपडे, योगेश मोहीते, यांनी केली आहे.

